# प्रकरण दुसरे

# प्रकरण - २

## सातारा शहर - एक दृष्टिक्षेप

### प्रस्तावना

या प्रकरणात सातारा शहराचा संक्षिप्त इतिहास मांडून सातारा नगर पालिकेची स्थापना, नगरपालिका म्हणून रूपांतर होण्याची पार्श्वभूमी, नगरपालिकेच्या सदस्यांची निवडणूक पद्धती, नगरपालिकेच्या समित्या, सभा, आणि सातारा नगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत याचेबद्दल सविस्तर माहिती मांडलेली आहे.

### सातारा शहर

सातारा शहर सहयाद्री पर्वताच्या पूर्व उतारावरील डोंगराळ भागात वसले आहे. अजिंक्यतारा किल्ल्याच्या उत्तरेकडील उतारावर वसलेले हे शहर मुंबई-पूणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग व महाबळेश्वर-सातारा-पंढरपूर या राज्य महामार्गावर आहे.

### सातारा शहराचा इतिहास

सातारा या संज्ञेचे अनेक अर्थ आणि व्युत्पत्ती सांगण्यात येतात. अजिंक्यतारा किल्ल्यावरील सप्तऋषींच्या देवालयामुळे हे नाव पडले असावे किंवा किल्ल्यास असणाऱ्या सतरा दरवाजांवरून सतराचा अपभ्रंश होऊन सातारा नाव पडले असावे. 'सितारा'या फारशी शब्दापासून सातारा शब्द आला असावा असाही एक समज आहे.

छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर शाहू व ताराबाई यांच्यात सातारा गादीसाठी संघर्ष निर्माण झाला. सातारा गादीवर ताराबाईची हुकूमत असताना संभाजीपूत्र शाहूची मुघलांच्या कैदेतून ८ मे १७०७ रोजी सुटका झाली. यानंतर सातारा राजधानी कब्जात घेऊन शाहू मराठी साम्राज्याचा अधिपती बनला व माघ शुद्ध १, सोमवार, शके १६२९ (दिनांक १२ जानेवारी १७०८) रोजी त्याने आपला राज्याभिषेक करवला. त्यानेच शाहूनगर तथा सातारा गाव वसवले. या शाहूनगराची रचना व त्यातील भागांची नावे शाहू छत्रपतींच्या आमदानीची आठवण करून देतात. शाहूनगराची स्थापना सन १७२१ च्या सुमारास झाली. [१]

शहरातील पेठांची नावे सात वारांवरून ठेवली असून त्याशिवाय रामाचा गोट, यादोगोपाळ पेठ, व्यंकटपुरा, चिमणपुरा, दुर्गापुरा, केसरकर पेठ, राजसपुरा, पंताचा गोट, रघुनाथपुरा इत्यादी नावे ऐतिहासिक व्यक्तिंवरून पडली आहेत.

येवतेश्वराहून व महादऱ्याहून नळाने पाणी आणून साताऱ्यास भरपूर पाण्याची व्यवस्था शाहूंच्या वेळेपासून करण्यात आली होती. [२]

**इतर माहिती** - माची भागातून उरमोडी खोऱ्यात डोंगर ओलांडून जाणे त्रासाचे होते. दक्षिणेकडे कराडकडे जाण्यासाठी किंवा परळी किल्ल्यावर जाण्यासाठी बोगदा बांधण्याचे काम १८५५ मध्ये कॅ. पी. एल हॅरी याच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. त्यावेळी ओगिल्व्ही हा साताऱ्याचा कमिशनर होता. या बोगदयासाठी २९,००० रु. खर्च आला होता.

**अदालत वाडा** - किल्ल्याच्या पायथ्याशी बोगद्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर शाहू महाराजांच्या कालावधीपासून अस्तित्वात असलेल्या वास्तूचा महाराज न्यायालयसारखा उपयोग करीत. नंतर पेशव्यांच्या काळात तिचा खाजगी वापरासाठी उपयोग होई. या वास्तूचा पाया १० फूट (३ मी.) उंच आहे. प्रवेशद्वार साधे असून न्यायासनाकडे जाण्यासाठी इमारतीभोवताली मोठया आयताकृती बारा पायऱ्या आहे. ही मोठया दगडात बांधलेली इमारत ६७.५ मी. लांब व ४८मी. रुंद आहे. इ.स. १८७६ पर्यंत या इमारतीचा दिवाणी न्यायालय म्हणून उपयोग होत असे. सध्या अदालत वाडा सातारा राजकुळाचे वसतीस्थान आहे. [३]

**अजिंक्यतारा** - पूर्वी सातारा या नावानेच प्रचलित असलेल्या अजिंक्यतारा किल्ल्यावरील सप्तऋषींच्या देवालयामुळे या किल्ल्यास सातारा नाव पडले. पऱ्हाळगडावर राज्य करणाऱ्या शिलाहार राजांपैकी दुसरा भोज (इ.स. ११७८ - ११९३ ) याने पंधरा किल्ले बांधले असून त्यात सातारा किल्ल्याची नोंद मिळते. तसेच अजीमतारा हे नाव या किल्ल्यास आहे. औरंगजेबाने इ.स.१७०० मध्ये हा किल्ला घेतला त्यावेळी त्याचा मुलगा अजीमशहा याच्या नावावरून अजिमतारा हे नाव दिले. विजापूरच्या ताब्यात असलेला हा किल्ला शिवाजी महाराजांनी २७ जुलै १६७३ रोजी आपल्या ताब्यात घेतला. [४]

**चार भिंती -** किल्ल्याच्या पूर्वेकडील डोंगरावर चार भिंती दिसतात. राजघराण्यातील स्त्रिया दसऱ्याची मिरवणूक येथे बसून पाहत असत. पूर्वी ही टेहळणीची जागा असावी. सन १८५७ च्या उठावाच्या शताब्दिनिमित्त १९५७ मध्ये या ठिकाणी स्मारकस्तंभ उभारण्यात आला आहे.

**जुना राजवाडा -** प्रतापसिंहानी १८२४ मध्ये हा वाडा बांधला. या वाडयात शोभिवंत भित्तीचित्रे आहेत. सध्या या इमारतीत प्रतापसिंह हायस्कूल आहे.

**नविन राजवाडा -** हा राजवाडा प्रतापसिंहानंतर गादीवर बसलेल्या आप्पासाहेबांनी १८४४ मध्ये बांधला. या वाडयातील भिंतींवर रामायण,महाभारत या महाकाव्यांतील तसेच पुराणातील कथानकांवर आधारलेली भित्तीचित्रे रेखाटली आहेत. या चित्रांमधील मांडणी,सामग्री व रेखाटन पूर्ण मराठा शैलीची आहेत.

**जलमंदीर -** शुक्रवार पेठेत हे जलमंदीर आहे. याच ठिकाणी भवानी देवीचे मंदिर आहे. छत्रपतींचे खासगी दैवत या मंदिरात आहे. सध्या येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे १३ वे वारसदार छत्रपती उदयनराजे भोसले यांचे वास्तव्य आहे.

**नगरवाचनालय -** प्रतापसिंहांचे हे खाजगी ग्रंथालय १८४९ मध्ये जनतेसाठी देण्यात आले. त्यास सार्वजनिक वाचनालयाचे स्वरूप १८५३ पासून प्राप्त झाले.

**श्री. छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय -** याचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते १३ जानेवारी १९७० ला झाले. या संग्रहालयाचे बहिस्थ विभाग व मराठा आर्ट गॅलरी असे दोन विभाग आहेत. बहिस्थ विभागात शस्त्र विभाग,अभिलेख विभाग,रंगचित्र विभाग व वस्त्र विभाग असे चार भाग आहेत. हे संग्रहालय पुरातत्व व वस्तूसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या नियंत्रणाखाली आहे.

**उत्तर चिदंबरम् नटराज मंदिर -** हे मंदिर सातारा - पंढरपूर मार्गावर आहे. हयाचे बांधकाम १९८१ मध्ये सुरू होऊन १९८५ मध्ये पूर्ण झाले. यातील गर्भगृहातील नटराजाची मूर्ती १.३७ मी. उंचीची आहे. या मूर्तीस आनंदनरेशही म्हणतात. या नटराजास वर्षातून सहा वेळा महाभिषेक घालतात.

**आकाशवाणी केंद्र आणि दूरदर्शन केंद्र -** केंद्र सरकारने येथे १३ नोव्हेंबर १९९२ रोजी आकाशवाणी केंद्र सुरू केले असून या केंद्राची परिसिमा सातारा जिल्हयापुरती मर्यादित आहे.

अजिंक्यतारा किल्ल्यावर असलेले हे लघुशक्ती केंद्र १ जून १९८६ रोजी सुरू झाले. यामुळे २५ कि.मी.परिक्षेत्रात प्रक्षेपण दिसते. येथून मुंबई व दिल्ली केंद्राचे कार्यक्रम पुन:प्रक्षेपित केले जातात.

**शाहू स्टेडियम -** साताऱ्याच्या एस.टी. स्टॅंडजवळ मोठे स्टेडियम आहे. ते छत्रपती शाहू स्टेडियम नावाने प्रसिद्ध असून येथे राज्यस्तरावरील क्रिकेट,कबड्डी,व्हॉलीबॉल,फूटबॉल, हॉकी सारख्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. नुकतेच याचे नूतनीकरण केले गेले आहे.

ऐतिहासिक काळात असणारे राजकिय महत्त्व संपले तरी मराठेशाहीची सुविख्यात राजधानी म्हणून साताऱ्याचा अभिमान सर्वच महाराष्ट्रीयनांना वाटतो.

**नगरपालिका**

सन १८५० च्या २६ व्या अधिनियमानुसार सातारा,माल्कमपेठ, मायणी,म्हसवड,रहिमतपूर व वाई येथे शासननियुक्त सदस्यांच्या म्युन्सिपल समित्या कार्यरत होत्या. जिल्हाधिकारी समितीचा अध्यक्ष आणि उपजिल्हाधिकारी उपाध्यक्ष असून शासकीय अधिकारी सभासद असत. काही ठिकाणी मामलेदार अध्यक्ष असे.[५]

सन १८७३ च्या सहाव्या कायदयानुसार १०,००० पेक्षा जास्त लोकसंख्येसाठी सिटी म्युन्सिपालिटी आणि दोन हजारापेक्षा जास्त लोकसंख्येसाठी टाऊन म्युन्सिपालिटी स्थापन केल्या होत्या.त्यानुसार सातारा, कराड, माल्कमपेठ, मायणी, म्हसवड,रहिमतपूर व वाई येथे टाऊन म्युन्सिपालिटी होत्या. सन १८८२ च्या कायदयाद्वारे नगरपालिकेत निवडणूका होऊ लागल्या व १८८४ च्या कायदयाने स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी करण्यात आले. सन १८८४ मध्ये सातारा टाऊन म्युन्सिपालिटीला सिटी म्युन्सिपालिटीचा दर्जा मिळाला. सन १८९० मध्ये मिलिटरी कँटॉनमेन्ट बरखास्त झाल्यानंतर त्या विभागासाठी सातारा सबर्बन म्युन्सिपालीटीची स्थापना करण्यात आली.[६]

बॉम्बे डिस्ट्रिक्ट म्युन्सिपल ॲक्ट १९०१ मध्ये अंमलात आल्यानंतर त्यानुसार सातारा सबर्बन रहिमतपूर, फलटण,म्हसवड,वाई, महाबळेश्वर व पाचगणी नगरपालिकांचा तर बॉम्बे म्युन्सिपल बरो ॲक्ट १९२५ नुसार सातारा व कराडच्या नगरपालिकांचा कारभार चालत असे.[७] पुढे १९६१ मध्ये सातारा सबर्बन नगरपालिकेचे सातारा नगरपालिकेत विलिनीकरण झाले. त्यानंतर सर्वत्र महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ नुसार कारभार चालत असे.[८]

स्थानिक स्वराज्य संस्थेचा लोकशाही घटक म्हणून नगरपालिका प्रभावी रीतीने कार्य करु शकतील हे सुनिश्चित करण्यासाठी घटना (७४ वे) दुरूस्ती अधिनियम,१९९२ अंमलात आला.यानुसार महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम , १९६५ तसेच नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९४९ मध्ये दुरूस्त्या करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ६ डिसेंबर १९९४ रोजी अधिनियम १९९४ अंमलात आणला. नवीन नियमानुसार पूर्वीच्या अधिनियमांमध्ये अमुलाग्र बदल करण्यात आले. या नियमांचे ठळक वैशिष्टय म्हणजे नगरपालिकांच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोग व स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्टया बळकट करण्यासाठी वित्त आयोग निर्माण करण्यात आला. याबरोबरच या अधिनियमानुसार ‘नगरपंचायत ’व ‘औदयोगिक शहरीकरण’ ही दोन नवीन प्रकरणे समाविष्ट करण्यात आली असून त्यासाठी क्षेत्र निश्चिती करण्याबाबतचे नियम विहित करण्यात आले आहेत. ‘लहान नागरी क्षेत्र’ घोषित करण्यासाठी त्या विभागातील लोकसंख्या २५,००० पेक्षा अधिक असणे आवश्यक असून बिगर- कृषी क्षेत्रातील नोकरवर्गाची संख्या ३५ टक्क्यांहून अधिक असणे आवश्यक आहे.[९]

दुरूस्ती अधिनियम १९९४ नुसार नगरपालिकांचे तीन प्रकार करण्यात आलेले आहेत. एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या नगरपालिकेस ‘अ’वर्ग चाळीस हजार पेक्षा जास्त परंतू एक लाखापेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या नगरपालिकेस ‘ब ’ वर्ग आणि चाळीस हजार किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नगरपालिकेस ‘क’ वर्ग असे वर्गीकरण करण्यात आले आहे.[१०]

नवीन नियमांनुसार नगरपालिकांमध्ये वॉर्ड कमिटीच्या सरळ निवडणुकीद्‌वारे प्रत्यक्ष निवडून आलेले सदस्य व नामनिर्देशित सदस्य यांचा समावेश होतो. नामनिर्देशित केलेले सदस्य निवडून आलेल्या सदस्य संख्येच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त नसतील किंवा ते पाच असतील. या दोन्हीपैकी जी संख्या लहान असेल तेवढे सदस्य नामनिर्देशित केले जातात. विशेषत: नगरपालिका प्रशासनाचा अनुभव व ज्ञान ज्या व्यक्तींना असेल अशाच व्यक्तींना नामनिर्देशित केले जाते . अनुसूचित जाती ,अनुसूचित जमाती,इतर मागास प्रवर्ग व स्त्रिया यांना आरक्षण ठेवण्यात आले

आहे. नगरपालिकांच्या वर्गवारीनुसार निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे. हे तक्ता क्र. २.१ वरून स्पष्ट होते.

**तक्ता क्र. २.१**

**निवडून येणारे नगरपालिका सदस्य**

| नगरपालिका वर्ग | निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या. |
|---|---|
| 'अ' वर्ग | निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या कमीत कमी ३८ राहील आणि १,००,००० लोकसंख्येच्या वर प्रत्येक ८,००० लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त सदस्य असेल. परंतू अशा प्रकारे होणाऱ्या एकूण सदस्यांची संख्या ६५ पेक्षा अधिक नसेल. |
| 'ब' वर्ग | निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या कमीत कमी २३ राहील आणि ४०,००० लोकसंख्येच्या वर प्रत्येक ५,००० लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त सदस्य असेल. परंतू अशा प्रकारे होणाऱ्या एकूण सदस्यांची संख्या ३७ पेक्षा जास्त नसेल. |
| 'क' वर्ग | निवडून येणाऱ्या सदस्यांची कमीत कमी संख्या १७ राहील आणि २५,००० लोकसंख्येच्यावर प्रत्येक ३,००० लोकसंख्येसाठी एक अतिरिक्त सदस्य असेल. परंतू अशा प्रकारे निवडून येणाऱ्या एकूण सदस्यांची संख्या २३ पेक्षा अधिक नसेल. |

**सातारा नगरपालिका - (स्थापना - १ ऑगस्ट १८५३)** सन १८५० चा कायदा लागू केल्याचा जाहिरनामा मुंबई सरकारच्या १४ जुलै १८५३ च्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर कमिशनर,अध्यक्ष व शासननियुक्त इतर पाच सदस्य अशा नेमणूका होऊन पहिले स्थानिक स्वराज्य बोर्ड अस्तित्वात आले व म्युन्सिपल कायदयाची अंमलबजावणी १ ऑगस्ट १८५३ पासून सुरू झाली. प्रथमतः कमिशनर व त्यानंतर कलेक्टर हे तिचे अध्यक्ष असत.शिवाय डेप्युटी कलेक्टर, एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, सिव्हिल सर्जन,मामलेदार, फौजदार असे अधिकारी तिच्यावर शासननियुक्त

सभासद असत. ही नगरपालिका १८७३ च्या म्युनिसिपल ॲक्ट ६ नुसार १८७५ मध्ये टाऊन म्युनिसिपालीटी म्हणून रूपांतरीत झाली तर मार्च १८८४ मध्ये सिटी म्युनिसिपालीटीमध्ये रूपांतरीत झाली . सन १८८२-८३ मध्ये नगरपालिकेचे उत्पन्न केवळ ५१,२७० रुपये व खर्च ९३,०८० रुपये होता. स्थानिक स्वराज्य कायदयात बदल झाल्यामुळे १८८५ पासून निवडणूका घेण्यात येऊ लागल्या तथापि कलेक्टर अध्यक्ष व त्यांचे मदतीस बारा शासननियुक्त व बारा लोकनियुक्त असे २५ सदस्यांचे बोर्ड अस्तित्वात आले. सातारा कॅम्प हद्दीत पूर्वी मिलिटरी कँटोनमेन्ट होते. ते बरखास्त झाल्यानंतर तेथील लोकांना नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १८९० मध्ये सातारा सबर्बन म्युनिसिपालीटीची स्थापना करण्यात आली.त्यामध्ये १२ सदस्य होते. दिनांक १ नोव्हेंबर १९६१ रोजी सातारा सबर्बन नगरपालिकेचे सातारा नगरपालिकेत विलिनीकरण होऊन सभासदांची संख्या ४५ झाली.

सन १८६६ मध्ये प्रथम घरपट्टी आकारण्यात आली.[११] घरांचे चार वर्ग करून त्यावर सालिना अनुक्रमे रु.८, रु.४, रु.२ व रु.१ या प्रमाणात घरपट्टी बसवली. १८८२ साली वाहने व जनावरांवर कर आकारणी सुरू झाली. १८९३ पासून खाजगी पाणी कर घेण्यास सुरूवात झाली. १८८५ पर्यंत शहरातील सर्व शाळा सरकारी किंवा खाजगी होत्या. दिनांक १ एप्रिल १८८५ रोजी नगरपालिकेने प्राथमिक शिक्षण ताब्यात घेऊन सात मराठी शाळा, एक रात्रीची शाळा व एक मुलींची शाळा सुरु केली.[१२] नगरपालिका सदस्यांसाठी १८८५ मध्ये पहिली निवडणूक झाली. त्यावेळी पदवीधर, उच्च दर्जाचे शासकीय अधिकारी व चार रूपयांपेक्षा जास्त कर भरणाऱ्या नागरिकांना मतदानाचा अधिकार होता.म्हणजे मतदानाचा हक्क मर्यादित असून केवळ श्रीमंत वर्गाने स्थानिक स्वराज्य संस्थेत सहभागी होण्याची संधी मिळवली होती. याशिवाय १९०९ पर्यंत अध्यक्ष निवडण्याचा हक्क किंवा स्वातंत्र्य सदस्यांना नव्हते. म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था परिपूर्णपणे 'स्थानिक' नसून ब्रिटीश अधिछत्राखाली शासनाच्या प्रतिनिधी सारखे कार्य पार पाडत होती . सन १९०९ सालापासून नगरपालिकेस अध्यक्ष निवडण्याचा हक्क मिळाला.

शहराच्या पाणीपुरवठयासाठी नगरपालिकेने १८८६ मध्ये कास तलाव बांधला.इ.स. १९३५ मध्ये या पाणीपुरवठा योजनेत वीज उत्पन्न करण्याच्या दृष्टीने बदल करण्यात आला. त्यामुळे पाणीपुरवठयासह शहरास विजेचा पुरवठा होऊ लागला. सातारा जिल्हयासाठी शासनाने १८ नोव्हेंबर

१९६३ रोजी नगररचना व विकास योजनांसाठी सातारा येथे नगररचना कार्यालय उघडले.दिनांक १ मे १९८२ पासून सातारा ही 'अ' वर्ग नगरपालिका झाली.[१३]

**सातारा नगरपरिषद सदस्य**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयोगिक नागरी अधिनियम ,१९६५ अन्वये 'अ' वर्ग पालिका क्षेत्रातील निवडून आलेल्या सदस्यांची संख्या ही किमान ३८ असेल आणि १,००,००० पेक्षा अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ८,००० लोकसंख्येकरिता निवडून आलेला एक जादा पालिका सदस्य असेल. तथापि अशा रितीने निवडूनआलेल्या पालिका सदस्यांची एकूण संख्या ६५ हून अधिक असणार नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद ,नगरपंचायती व औदयोगिक नागरी अधिनियम , १९६५ च्या वरील तरतुदीन्वये सातारा नगरपालिकेतील एकूण निर्वाचीत सदस्यांची संख्या ३९ आहे तर नामनिर्देशित सदस्य ४ आहेत.

**सातारा नगरपालिका समित्या** (परिशिष्ट क्र. ३)

महाराष्ट्र नगरपरिषदा, ,नगरपंचायती व औदयोगिक नागरी अधिनियम, १९६५ अन्वये प्रत्येक 'अ' वर्ग नगरपालिकेसाठी १ स्थायी समिती व ६ विषय समित्या असतात. त्यान्वये सातारा नगरपालिकेत पुढील समित्या आहेत.

**१}** स्थायी समिती

**२}** विषय समित्या ----- १. सार्वजनिक बांधकाम समिती.

२. नियोजन आणि विकास समिती.

३. पाणी पुरवठा व जल निःस्सारण समिती.

४. स्वच्छतेविषयी वैदयकीय आरोग्य रक्षण समिती.

५. महिला व बालकल्याण समिती.

६. शिक्षण समिती.

सातारा नगरपालिकेत या ६ संवैधानिक विषय समित्या आहेत आणि याव्यतिरिक्त १ असंवैधानिक विशेष समिती आहे. ती म्हणजे मागासवर्गीय कल्याण विशेष समिती. सातारा नगरपालिकेच्या या विविध विषय समित्यांमार्फत, त्या विषयांची कामे मंजूर करणे, शिफारस करणे,

दर मंजूर करणे, अशा प्रकारचे लोकोपयोगी धोरणात्मक निर्णय घेण्याचे कामकाज केले जाते. विविध समित्यांनी बैठकीद्वारे घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी नगरपालिकेच्या नोकरवर्गाकडून केली जाते. सातारा नगरपालिकेस विविध कार्यक्रम राबवण्यासाठी मोठया प्रमाणात खर्च करावयास लागतो. आता नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांविषयी माहिती घेऊ या.[१४]

**नगरपालिकेची उत्पन्नाची साधने**

अ) नगरपालिका दर व कर- जमिनी व इमारतीमधील कर, सर्वसाधारण कर (वृक्षकर), दिवाबत्तीवरील कर नवीन, थिएटर कर, जाहिरात कर, शिक्षण कर (सरकारी), रोजगार हमी कर (सरकारी), विशेष स्वच्छता कर, पाण्यावरील विशेष कर, बांधकाम पाणी कर, विशेष शिक्षण कर, कोंडवाडे, विकास कर,

ब) विशेष अधिनियमांखालील वसुली – भेसळ प्रतिबंधक परवाना फी,

क) नगरपालिकेच्या मालमत्तेतून मिळणारे उत्पन्न – जागा भाडे, इमारतीचे भाडे, शाहू कलामंदिर भाडे, मंडप भाडे, उद्यानापासून मिळणारे उत्पन्न, शैक्षणिक परिसंस्थांपासून मिळणारे उत्पन्न, वैद्यकीय परिसंस्थांपासून मिळणारे उत्पन्न, मंगल कार्यालय भाडे, स्टेडीयम वापर फी, मंडई भाडे, स्लॉटर फी, पोहणे फी, ट्रान्सपोर्ट शुल्क, लायसेन्स फी, बांधकाम परवाना फी, नोटीस फी, वॉरंट फी, प्रोजेक्शन फी, जन्म–मृत्यु नोंद फी, इतर जमीनतळ,

ड) अनुदाने व अंशदाने – आय.डी.एस.एम.डी., जकात नुकसान भरपाई, टेलीफोन खात्याकडे नुकसान, कुटूंब नियोजन, जनगणना मानधन, विकास योजना व नियोजन, महागाई भत्ता, समान संवर्गाच्या पदाचे वेतन व भत्ते, गलिच्छ वस्ती सुधार, करमणूक कर अनुदान, रस्ते बांधणे व परिरक्षण, जमिन महसूल अनुदान, मुंबई मोटार वाहन कर, सुवर्ण जयंती सुवर्ण रोजगार योजना, आमदार फंड, मालमत्ता व मुद्रांक शुल्क, विकास योजना कर्ज, हुतात्मा स्मारक, भूसंपादन, वित्त आयोग, कोर्ट ग्रँट, दलित वस्ती, टी.सी.एल.पावडर, घर तेथे शौचालय, प्रशिक्षण व मानधन, शिक्षण कर रिबेट, रोजगार हमीकर रिबेट,

इ) संकीर्ण - नगरपालिका गुंतवणूकीवरील व्याज, प्रतिलिपी करणेची आणि ताडून पाहणेची फी, जुन्या भांडारांच्या विक्रीचे उत्पन्न, मतदारयाद्या आणि इतर प्रकाशन विक्रीचे उत्पन्न आदेशिका फी व विधी, इतर जमा रक्कमा (जादा गेलेले परत, ऑडिट रिकव्हरी, किरकोळ)

वर दर्शविलेल्या करांची संख्या मोठी असून नगरपालिकेला लागणारा निधी यातून मोठ्या प्रमाणात मिळतो असे म्हणण्यास हरकत नाही.

वरील घटकांपासून मिळालेल्या उत्पन्नांपासून अनेक विकास योजना राबवल्या जातात.

सातारा नगरपालिकेच्या विषय समित्यांची सभा दर महिन्यातून एकदा तरी आयोजित करण्याचे बंधन आहे. तसेच या सभेव्यतिरिक्त कितीही विशेष सभांचे आयोजन करता येते. नगरपालिकेचे सर्वसाधारण सभेचे तीन प्रकार आहेत. १) दोन महिन्यातून किमान एकदा होणारी सर्वसाधारण सभा सभेसाठी सात पूर्ण दिवसांची सभेची नोटीस दयावी लागते. २) विशेष सभा सभेसाठी तीन पूर्ण दिवसांची सभेची नोटीस दयावी लागते. ३) तातडीची सभा सभेसाठी एका पूर्ण दिवसाची नोटीस दयावी लागते.

## संदर्भ सूची


१) सरदेसाई, पूर्वोक्त, खंड ३ पृ.५०

२) सरदेसाई, पूर्वोक्त, खंड ४, पृ १९८

३) सातारा नगरपालिका, सातारा

४) सरदेसाई, पूर्वोक्त, खंड १ पृ. ३०४

५) सातारा गॅझेटिअर, १९८९, पृ. ६२८

६) सातारा गॅझेटिअर, १९८९, पृ. ६२८

७) सातारा गॅझेटिअर, १९८६, पृ. ६२९

८) सातारा गॅझेटिअर, १९८६, पृ. ६२८

९) सातारा गॅझेटिअर, १९८६, पृ. ६२८

१०) ॲड. शेलकर अभया, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५, २००६, पृ. ७८

११) सातारा गॅझेटिअर, १९८९, पृ. ६३१

१२) सातारा गॅझेटिअर, १९८९, पृ. ६३१

१३) सातारा गॅझेटिअर, १९८९, पृ. ६३१

१४) सातारा नगर पालिका अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक पुस्तिका, सातारा नगरपालिका प्रकाशित, २००१-०२ ते २००५-०६